# संपादकीय

आजच्या जगातील स्त्री औद्योगीक युगात जगत आहे. पाश्चिमात्य आणि इतर देशांतील औद्योगीकरणा- मुळे उद्योगधंदे झपाटयाने वाढले आणि स्त्रियांनी घराबाहेर पडून समाजाच्या आर्थिक व्यवहारात भाग घेण्याची गरज निर्माण झाली. बदलत्या वाता- वरणाबरोबर मूल्येही बदलू लागली. स्त्रीशिक्षण, समा- नता वगैरे मूल्यांचा उगम होऊन ती स्वीकारणे स्त्री व पुरुष दोघांनाही भाग पडले. पारंपरिक जीवनाला, रूढींना काही प्रमाणात मुरड घालूनच जीवनाचे नवे वळण तयार होऊ लागले. अशा तऱ्हेने समानतेचे तत्त्व निदान कागदावर स्वीकारणे, कायद्यामध्ये स्वीकारणे हे पहिले पाऊल टाकले गेले.

प्रत्यक्षात मात्र जरूर पडेल तेवढयाच प्रमाणात स्त्री-पुरुष संबंधामध्ये समानता आली. आर्थिक स्वातं- त्र्याचा, नोकरी करण्याचा स्त्रीचा हक्क मान्य झाला. तिचे आर्थिक परावलंबित्व, लौकिक जीवनातील अग- तिकता काही प्रमाणात संपुष्टात आली. याचा परिणाम तिच्या मानसिक अवस्थेवर झाल्याशिवाय राहिला नाही. आत्मविश्वास मिळविलेली, स्वावलंबी, स्वाभिमानी, निर्भय स्त्री हळूहळू घडू लागली. नव्या वातावरणामध्ये ज्यांना संधी मिळाली त्यांनी संधीचे सोने केले व स्त्री- मधील सुप्त शक्तींचे दर्शन जगाला व स्त्रीजातीला घडविले. अर्थातच सर्वसाधारण स्त्रीचे स्थानसुद्धा या आर्थिक स्वातंत्र्याच्या काळात पूर्वीपेक्षा काहीसे उंचावले. अजूनही स्त्री-पुरुष संबंधामध्ये समानता प्रस्थापित झालेली नाही. परंतु समाजवादी देशांत त्यादृष्टीने विशेष प्रयत्न सतत चालू राहिलेले आढळतात. केवळ वैयक्तिक पातळीवर नव्हे तर सरकारसुद्धा स्त्रियांचा दर्जा वर आणण्यासाठी व त्यांच्या सुप्त शक्तींचा मुक्त आविष्कार व्हावा यासाठी प्रयत्नशील राहिलेले दिसते.

हा आढावा घेण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अजूनही आपल्याकडे (भारतामध्ये) एक जीवनदृष्टी म्हणून आपण स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याची गरज मान्य केलेली नाही. पण त्याचबरोबर स्त्री हा मागासलेला समाज- घटक समजून तिचा दर्जा वाढविण्याचा खास व सात- त्याचा प्रयत्न सरकारी पातळीवर किंवा खाजगी संस्थां- च्याही पातळीवर होताना दिसत नाही, होऊ शकत नाही. याची दोन मुख्य कारणे आम्हांला दिसतात. एक म्हणजे सध्याची सामाजिक व आर्थिक व्यवस्था व सरकार बेकारीचा प्रश्न सोडवू शकत नाही. कुटुंबातील कमीत कमी एका पुरुषालाही जेथे नोकरी मिळू शकत नाही तेथे स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न अधिकच मागे ढकलला जातो. याचाच परिणाम म्हणजे सोयीस्कर- रीत्या बेकारीची नोंद करताना १८ वर्षावरील प्रत्येक काम नसलेली स्त्री बेकार समजली जात नाही. व अशा तऱ्हेने स्त्रीला काम देण्याची जबाबदारी उचलण्याचे टाळले जाते. दुसरे कारण असे की मध्यमवर्गीय पुरुष व स्त्री अजूनही स्त्रीने उंबरठ्याच्या बाहेर जाऊन नोकरी करण्याला तत्त्वतः विरोधी भूमिका घेतात, 'घराचे घरपण कसे राहील!' 'मुलांवर योग्य ते संस्कार कसे होतील?' असे नैतिक प्रश्न पुढे आणून स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याचे तत्त्व ते जीवनदृष्टी म्हणून मान्य करीत नाहीत. स्त्री-पुरुष संबंधातील समानता तत्त्वतः मान्य करूनसुद्धा ती समानता व्यवहारात कशी येऊ शकते, या समानतेचा पाया काय याचा समग्र विचार करणे त्यांना गैरसोयीचे वाटते. या विचार- सरणीमध्ये स्त्रियाही हिरिरीने भाग घेतात; आपल्याच गुलामीचे त्या अप्रत्यक्षरीत्या समर्थन करीत असतात. मुलांचा प्रश्न कसा सोडवायचा, घरकामाची पुनर्रचना कशी करावयाची वगैरे व्यावहारिक प्रश्न सोडविण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. नव्हे, जेथे इच्छा आहे तेथे मार्ग असतोच. मध्यमवर्गाचे हे वैचारिक मागासलेपण स्त्री-स्वातंत्र्य चळवळीला निश्चितच मारक ठरते. आज खरा प्रश्न असा आहे की स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाचा उद्घोष करीत थांबून न रहाता या समानतेकडे

जाण्याचा मार्ग आम्ही कसा आखतो, त्यासाठी कोणते कार्यक्रम हाती घेतो !

स्त्री-मुक्तीच्या प्राक्रियेचा पहिला भाग म्हणून स्त्रीचे आर्थिक स्वातंत्र्य, तिने उंबरठ्याबाहेर पडून सामाजिक व आर्थिक व्यवहारात भाग घेण्याची गरज या गोष्टी तत्वत: मान्य झाल्या पाहिजेत. आजची सर्वसाधारण स्त्री ही मुख्यत: आर्थिक परावलंबनाचा बळी आहे. आजच्या स्त्रीची संकुचित दृष्टी, कोते मन, बायकी भांडकुदळपणा, बौद्धिक औदासीन्य हे सर्व दुर्गुण जन्मजात आहेत असे नाही. आजची स्त्री ही चार भिंतींच्या आत राहिल्यामुळे तयार झालेल्या डबक्यातील वातावरणाची गुलाम आहे. आजची स्त्री ही आमच्या परंपरागत संस्कृतीचे जतन करण्यासाठी निर्माण केल्या गेलेल्या पुरुषप्रधान विचारप्रणालीची गुलाम झालेली आहे. अगदी अनादि काळापासून कष्ट करीत आलेली कष्टकरी स्त्री, दलित स्त्रीसुद्धा या संस्कृतीच्या कचाट्यातून सुटलेली नाही. तरीसुद्धा बारकाईने नजर फिरविली तर लक्षात येते की ही कष्टकरी स्त्री भाकरीला मोताद असेल पण घरंदाज बायकांपेक्षा तिने अधिक प्रमाणात आपले स्वत्व टिकवून ठेवले आहे. लग्नसंस्थेला ती करकचून बांधली गेलेली नाही. अंगात कष्ट करण्याची धमक असल्यामुळे अगदीच असहाय्य अबला न ठरता अन्यायाचा काही प्रमाणात प्रतिकार करू शकते.

आजची मध्यमवर्गीय स्त्री जुन्या रुढी, जुनी मू आणि नव्या गरजा यांच्या कात्रीत सापडली आहे. नवरा कुटुंबाचा खर्च सांभाळतो. नवऱ्याची अरेराव सहन करत का होईना पण तिला फारशी तोशीस पडता आरामात राहाता येते याचे तिला समाधान वाटते. परंतु आर्थिक स्वातंत्र्य नाही म्हणून हे दुय्यम स्थान स्वीकारावे लागते हे तिला हळूहळू अनुभवाने पटत चालले आहे. हळूहळू पारंपारिक कल्पनांच्या कोशातून ती बाहेर पडते आहे. मात्र बाहेर पडल्यावरही नोकरी मिळत नाही म्हणून अनेक वेळा तिला निराशा पत्करावी लागते.

'बायजा'चा हा अंक स्त्री व रोजगार या विषयाला प्राधान्य देणारा काढण्याचे ठरविले त्यामागील हेतू मुख्यत: हा आहे की स्त्रीची सुधारणा करण्याचे ध्येय स्वीकारणाऱ्या सर्वांना स्त्रीच्या मार्गातील अनेक अडचणी समजून घेण्यात अंकातील चर्चेचा उपयोग व्हावा; स्त्रीचा उत्पादक कामात सहभाग नसल्यामुळे स्त्रीची उन्नती घडवून आणण्याचे अनेक प्रयत्न कसे अयशस्वी होतात याविषयीचे विवेचन उद्बोधक व्हावे आणि स्त्रियांना रोजगार मिळावा म्हणून जे प्रयत्नशील होतील त्यांना मार्ग आखताना देशोदेशीच्या अनुभवापासून काही शिकावयाला मिळावे.